**L. A. BILL No. LI OF 2020.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE INDIAN PENAL CODE, THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973 AND THE PROTECTION OF CHILDREN FROM SEXUAL OFFENCES ACT, 2012, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.

**भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१८६० चा ४५.
१९७४ चा २.
२०१२ चा ३२.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यांमध्ये आणखी

सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२०, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

## प्रकरण दोन

### भारतीय दंड संहिता, याच्या सुधारणा

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १६६क ची सुधारणा.

**२.** भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, " दंड संहिता " असा केला आहे), याच्या कलम १६६क मधील,—

१८६० चा ४५.

(१) खंड (ग) मध्ये " कसूर करील " या मजकुरानंतर, "; किंवा " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (ग) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (घ) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १०० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील शिक्षापात्र अपराधांचे अन्वेषण करताना, पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या विनिर्दिष्ट निदेशांचे पालन करण्यात बुद्धिपुरस्सर कसूर करील, ".

१९७४ चा २.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ यात कलम १७५क समाविष्ट करणे.

**३.** दंड संहितेच्या कलम १७५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पोलीस अन्वेषणाकरिता विदा (डेटा) पुरविण्यास कसूर करणे.

" **१७५क.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही मध्यस्थ किंवा परिरक्षक यांसह जो कोणतेही समाज माध्यम व्यासपीठ किंवा आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा) पुरवठादार, कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ याखालील शिक्षापात्र असलेल्या अपराधाचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्याप्रमाणे, त्यास, अशी मागणी मिळाल्यापासून कामकाजाच्या सात दिवसांच्या कालावधीत, असा दस्तऐवज व वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) अभिलेख यांसह अशी कोणतीही विदा (डेटा) पुरविण्यास कसूर करील, तो, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या किंवा पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या, किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.".

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ यात कलम १८२क समाविष्ट करणे.

**४.** दंड संहितेच्या कलम १८२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

खोटी तक्रार केल्याबद्दल किंवा लोकसेवकास विवक्षित अपराधांची खोटी माहिती दिल्याबद्दल शिक्षा.

**" १८२क.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ याखालील शिक्षापात्र अपराधाच्या बाबतीत अवहेलना करणे, खंडणी उकळणे, धमकावणे किंवा मानहानी करणे किंवा सतावणे या उद्देशाने कोणत्याही व्यक्तीविरुद्ध खोटी तक्रार करील किंवा खोटी माहिती देईल ती व्यक्ती एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या, किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल. ".

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २२८क ची सुधारणा.

**५.** दंड संहितेच्या कलम २२८क मधील, पोट-कलम (१) मध्ये, " कलम ३७६, कलम ३७६क, " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " कलम ३७६ङ " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ ".

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३२६क ची सुधारणा.

**६.** दंड संहितेच्या कलम ३२६क मधील,—

(क) " ती व्यक्ती, दहा वर्षापेक्षा कमी नसेल " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

(क) " ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, अशा व्यक्तीच्या उर्वरित नैसर्गिक जीवनाच्या काळापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या ; किंवा

(ख) ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसविणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्यूदंडाच्या,

शिक्षेस पात्र असेल ";

(ख) पहिल्या परंतुकामधील, " वैद्यकीय उपचाराचा खर्च " या मजकुराच्या आधी, " सुघटन शल्यचिकित्सा व मुखपुनर्रचना यांच्या खर्चासह " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३२६ख ची सुधारणा.

**७.** दंड संहितेच्या कलम ३२६ख मध्ये, " सात वर्षांहून कमी नसेल " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " सात वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" सात वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, दहा वर्षांपर्यंत असू येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल ".

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ यामध्ये कलम ३५४ङ समाविष्ट करणे.

**८.** दंड संहितेच्या कलम ३५४घ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :–

महिलेचा विनयभंग करण्याशिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाद्वारे तिला धाकदपटशा दाखवणे.

" **३५४ङ** (१) जो कोणी, कोणत्याही कृत्याद्वारे, कृतीतून किंवा शब्दांद्वारे एखाद्या महिलेचा विनयभंग करण्याशिवाय तिला धोक्याची, धाकदपटशाची किंवा भीतीची जाणीव निर्माण होईल असे पुढील कृत्यांसह कोणतेही कृत्य जाणीवपूर्वक करील तो, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस, आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :–

(क) जे कामोद्दीपक किंवा स्वैराचारी स्वरूपाचे असेल अशा रीतीने, दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे, समाजमाध्यमा व्यासपीठाद्वारे किंवा संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल) मार्गाने क्षोभकारी संभाषण करणे ; किंवा

(ख) त्या महिलेच्या कोणत्याही लैंगिक कृतीतील सहभागासह, त्या महिलेच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे, इलेक्ट्रॉनिक किंवा इतर कोणत्याही स्वरूपाच्या माध्यमामार्फत वास्तविक किंवा बनावट वर्णनाचा समावेश असलेली कोणतीही ध्वनीफित किंवा चलचित्रफित टाकण्याची (अपलोड) किंवा प्रसारित करण्याची धमकी देणे ; किंवा

(ग) त्या महिलेची बदनामी करण्यासाठी किंवा तिचा दुर्लौकिक करण्यासाठी कोणत्याही स्वरूपातील सामाजिक वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) माध्यमाचा किंवा इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करणे, किंवा ;

(घ) ज्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे महिलेचा विनयभंग होईल किंवा तिच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशाप्रकारे तिच्या नावाचा, तपशिलांचा, छायाचित्रांचा किंवा इतर कोणत्याही ओळख साधनांचा वापर करणे.".

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३७६ ची सुधारणा.

**९.** दंड संहितेच्या कलम ३७६ मध्ये,–

(क) पोट-कलम (१) मधील, "सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल" या मजकुरानंतर "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे, अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये,–

(एक) खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(च-१) कोणत्याही प्रयोजनासाठी वापरलेल्या इमारतीस किंवा इमारतींतील किंवा इमारत संकुलातील,— मग कायद्याद्वारे विनियमित केलेले असो किंवा अन्यथा असो– कोणत्याही सार्वजनिक उपयोगी सेवेस सुरक्षा पुरविण्याच्या किंवा तिची देखभाल करण्याच्या प्रयोजनार्थ असलेला कर्मचारीवर्ग किंवा कंत्राटी कर्मचारी यांसह व्यवस्थापनावर असणारी किंवा व्यवस्थापनाने कामावर ठेवलेली जी कोणी, व्यक्ती, अशा क्षेत्रात एखाद्या महिलेवर बलात्कार करील ती व्यक्ती; किंवा";

(दोन) " द्रव्यदंडास देखील पात्र असेल" या मजकुरानंतर, " किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र असेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मधील, " आणि द्रव्यदंडाच्या " या मजकुरानंतर, "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३७६घ ची सुधारणा.

**१०.** दंड संहितेच्या कलम ३७६घ मध्ये, " आणि द्रव्यदंडाच्या देखील " या मजकुरानंतर, "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३७६घक ची सुधारणा.

**११.** दंड संहितेच्या कलम ३७६घक मध्ये, "आणि द्रव्यदंडाच्या" या मजकुरानंतर "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या सुधारणा

१९७४ चा २.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ यात कलम ३७क समाविष्ट करणे.

**१२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "फौजदारी प्रक्रिया संहिता" असा केला आहे) याच्या कलम ३७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पोलीस अन्वेषणासाठी विदा (डेटा) पुरविणे.

१८६० चा ४५.

२०१२ चा ३२.

" **३७ क.** कोणताही मध्यस्थ किंवा परिरक्षक यांसह प्रत्येक समाजमाध्यम व्यासपीठ, आंतरजाल किंवा चलदूरभाष संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलीफोनी) विदा (डेटा) पुरवठादाराने, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६ कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६ घ, कलम ३७६ घक, कलम ३७६ घख, किंवा कलम ३७६ ङ यांखालील शिक्षापात्र अपराधांचे किंवा लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ खालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधांचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अन्वेषण अधिकाऱ्याच्या मागणीवरून, दस्तऐवज किंवा वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) अभिलेखासह विदा (डेटा) पुरविणे बंधनकारक असेल.".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**१३.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(१) खंड (पाच) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (पाच-१) कलमे ३२६क व ३२६ख (म्हणजे, ॲसिडचा वापर करून आणि ॲसिड फेकण्याचा प्रयत्न करून गंभीर दुखापत करण्याशी संबंधित असलेले अपराध);

(पाच-२) कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ व कलम ३५४ ङ (म्हणजे, संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांद्वारे महिलेचा विनयभंग करण्याशी, लैंगिक छळवणूक करण्याशी, विवस्त्र करण्याशी, चोरून अश्लील चित्रण करण्याशी, चोरून पाठलाग करण्याशी, छळवणूक करण्याशी संबंधित असलेले महिलांच्या विरुद्धचे अपराध);";

(२) खंड (पाच क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (पाच ख) कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६ कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६ घक, कलम ३७६ घख व कलम ३७६ङ दोन्ही धरून (म्हणजे, बलात्कार व सामूहिक बलात्कार, इत्यादींशी संबंधित असलेले अपराध).".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०० ची सुधारणा.

**१४.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०० मधील, पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ क, कलम ३२६ ख, कलम ३७६, कलम ३७६ क, कलम ३७६कख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराधांच्या बाबतीत किंवा लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ यांखालील अपराधांच्या बाबतीत, झडती घेणारी व्यक्ती, झडती घ्यावयाची जागा ज्या ठिकाणी स्थित आहे त्या ठिकाणी जे उपलब्ध आहेत अशा दोन लोकसेवकांना किंवा महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने मान्यता दिलेल्या दोन सामाजिक कार्यकर्त्यांना पाचारण करील. जेव्हा साक्षेपी प्रयत्न करूनदेखील असे लोकसेवक उपलब्ध झाले नसतील तेव्हा, झडती घेणारी व्यक्ती, त्याची लेखी नोंद करून या पोट-कलमामध्ये तरतूद केलेली कार्यपद्धती अनुसरील.".

१८६० चा ४५.
२०१२ चा ३२.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १६४ ची सुधारणा.

**१५.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ मधील, पोट-कलम (५क) च्या खंड (क) मध्ये, " भारतीय दंड संहिता याच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१८६० चा ४५.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १७३ ची सुधारणा.

**१६.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१क) मधील, "कलमे ३७६, ३७६क, ३७६कख, ३७६ख, ३७६ग, ३७६घ, ३७६घक, ३७६घख किंवा ३७६ङ" या मजकुराऐवजी "कलम ३७६ख किंवा ३७६ग" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१ख) भारतीय दंड संहिता याच्या कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराधांच्या संबंधात, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने ज्या दिनांकास खबर नोंदविली होती त्या दिनांकापासून पंधरा कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत अन्वेषण पूर्ण करण्यात येईल :

१८६० चा ४५.

परंतु, ज्या दिनांकास खबर नोंदविण्यात आली होती त्या दिनांकापासून पंधरा कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत, अन्वेषण पूर्ण करणे शक्य होत नसेल तर, संबंधित अन्वेषण अधिकाऱ्याकडून त्याची कारणे लेखी नोंदविण्यात येतील; अशा प्रसंगांमध्ये, अशा अपराधांच्या आरोपीची ओळख पटविण्याच्या असमर्थतेचा अंतर्भाव करता येईल; यानंतर, संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षकास किंवा पोलीस आयुक्तास उक्त कालावधी आणखी सात कामकाजाच्या दिवसांपर्यंत वाढविता येईल :

परंतु आणखी असे की, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, या संहितेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जामिनाच्या वेगवेगळ्या तरतुदीं कोणताही परिणाम करीत असल्याचे मानण्यात येणार नाही.".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३०९ ची सुधारणा.

**१७.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जेव्हा चौकशी किंवा न्यायचौकशी ही, भारतीय दंड संहितेचे कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख, किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराधांशी संबंधित असेल तेव्हा, अशी चौकशी किंवा न्यायचौकशी, दैनंदिन तत्त्वावर केली जाईल आणि दोषारोपपत्र दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.".

१८६० चा ४५.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३२० ची सुधारणा.

**१८.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३२० मध्ये, पोट-कलम (२) मधील, तक्त्यातील, कलम ३३८शी संबंधित असणाऱ्या नोंदीनंतर पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| " महिलेचा विनयभंग करण्याशिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाद्वारे तिला धाकदपटशा दाखवणे. | ३५४ङ. | ज्या महिलेस धोक्याची, धाकदपटशाची, किंवा भीतीची जाणीव निर्माण होते अशी महिला.". |

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३२७ ची सुधारणा.

**१९.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३२७ मधील, पोट-कलम (२) मध्ये,—

(१) "भारतीय दंड संहितेच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, साक्षीपुरावा नोंदविणाऱ्या पीठासीन अधिकाऱ्याच्या कक्षात गुप्त (in camera) कार्यवाही करविण्यात येईल आणि पीडित व्यक्तीस किंवा दुर्बल साक्षीदारास सुरक्षित वाटावे यासाठी अशा पीठासीन अधिकाऱ्याकडून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येईल आणि याची साक्षीपुराव्यामध्ये नोंद करण्यात येईल.".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३७४ ची सुधारणा.

**२०.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३७४ मधील, पोट-कलम (४) मध्ये,—

१८६० चा ४५.

(१) " जेव्हा भारतीय दंड संहितेच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख ," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " पंचेचाळीस दिवसांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३७७ ची सुधारणा.

**२१.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३७७ मधील, पोट-कलम (४) मध्ये,—

(१) " जेव्हा भारतीय दंड संहितेच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " पंचेचाळीस दिवसांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४३८ ची सुधारणा.

१९९३ चा महा. २४.

**२२.** फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९३ याद्वारे दाखल केलेल्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३८ मधील, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

१८६० चा ४५.

" (२क) या कलमातील कोणतीही गोष्ट, भारतीय दंड संहिता, याच्या कलम ३२६क किंवा कलम ३२६ख किंवा कलम ३७६ किंवा कलम ३७६क किंवा कलम ३७६कख किंवा कलम ३७६घ किंवा कलम ३७६घक किंवा कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराध केला असल्याचा आरोप असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या अटकेचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही प्रकरणास लागू असणार नाही. ".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४३९ ची सुधारणा.

१८६० चा ४५.

**२३.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३९ मधील, पोट-कलम (१क) मध्ये, " भारतीय दंड संहितेच्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " कलम ३७६ घख खालील व्यक्तीच्या " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

१८६० चा ४५.

" भारतीय दंड संहितेच्या, कलम ३२६क किंवा कलम ३२६ख, किंवा कलम ३७६ चे पोट-कलम (३) किंवा कलम ३७६कख किंवा कलम ३७६घक किंवा कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील व्यक्तीच्या ".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या पहिल्या अनुसूचीची सुधारणा.

**२४.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पहिल्या अनुसूचीमधील, "**एक.—भारतीय दंड संहितेखालील अपराध**", या शीर्षाखालील,—

(क) कलम १७५ शी संबंधित असणाऱ्या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "१७५क. | समाजमाध्यम व आंतरजाल किंवा चल दूरभाष (मोबाईल टेलिफोनी) संदेशवहन प्रणाली विदा (डेटा) पुरवठादार, इत्यादींनी विदा (डेटा) पुरविण्यास कसूर करणे. | १ महिन्यापर्यंत साधा कारावास किंवा ५,००,००० रुपयांचा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथमवर्ग दंडाधिकारी."; |

(ख) कलम १८२ शी संबंधित असणाऱ्या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "१८२क. | लोकसेवकाला विवक्षित अपराधांची खोटी तक्रार किंवा खोटी माहिती दिल्याबद्दल शिक्षा. | १ वर्षापर्यंत साधा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथमवर्ग दंडाधिकारी."; |

(ग) कलमे ३२६क व ३२६ख यांच्याशी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "३२६क. | ॲसिड, इत्यादींचा वापर करून स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी अशा व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असू शकेल इतका कारावास आणि पीडित व्यक्तीला प्रदान करावयाचा द्रव्यदंड किंवा निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३२६ख. | स्वेच्छेने ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे. | ७ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. "; |

(घ) कलम ३५४घ शी संबंधित असणाऱ्या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "३५४ङ. | महिलेचा विनयभंग करण्या-शिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाने तिला धाकदपटशा दाखवणे. | २ वर्षांपर्यंतच्या मुदतीचा कोणत्याही वर्णनाचा कारावास आणि १,००,००० रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड. | दखलपात्र | जामीनपात्र | कोणताही दंडाधिकारी."; |

(ङ) कलम ३७६ शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "३७६(१) | पोट-कलम (२) खाली समाविष्ट असलेल्या व्यक्तींखेरीज इतर व्यक्तींनी केलेला बलात्कार. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासा-पर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास शिक्षा व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७६(२) | प्राधिकाऱ्याने किंवा विश्वासू व्यक्तीने केलेला बलात्कार. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास याचा अर्थ व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत इतका सश्रम कारावास व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३७६(३) | १६ वर्षे वयाखालील महिलेवर बलात्कार केल्याचा अपराध करणाऱ्या व्यक्ती. | २० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास याचा अर्थ व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असू शकेल सश्रम कारावासाची व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय.”; |

(च) कलमे ३७६घ व ३७६घक शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| “ ३७६घ | सामूहिक बलात्कार. | २० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास याचा अर्थ व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत शकेल इतक्या सश्रम कारावास शिक्षा आणि पीडित व्यक्तीला प्रदान करावयाचा द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३७६घक | १६ वर्षे वयाखालील महिलेवर सामूहिक बलात्कार. | आजीवन कारावास याचा अर्थ, त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळासाठी कारावास व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्याबाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय.”. |

## प्रकरण चार

## लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याच्या सुधारणा.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२५.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२, तो महाराष्ट्र राज्यास लागू असताना, (यात यापुढे, या प्रकरणामध्ये, ज्याचा निर्देश, “ लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम ” असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

२०१२ चा ३२.

“(ढ) “कर्मचारी वर्ग” याचा अर्थ, नियमित, तात्पुरता, कंत्राटी कर्मचारी किंवा कामगार म्हणून नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यात कोणत्याही प्रकारचे सहाय्य देणाऱ्या बाह्यस्रोत अभिकरणाने पुरविलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.”.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**२६.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, याच्या कलम ४ मधील, पोट-कलम (२) मध्ये, “ द्रव्यदंडास देखील पात्र असेल ” या मजकुराऐवजी, “पाच लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असेल किंवा ज्या प्रकरणी अपराधांचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडास पात्र असेल” हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२७.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,—

(क) खंड (घ) मधील, “यांचा सहवासी असणारा” या मजकुरानंतर, “किंवा रहिवाशी असणारा” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (ज) मधील, “ क्षारक पदार्थ ; किंवा ” या मजकुराऐवजी, “ क्षारक वस्तू किंवा मादक पदार्थ ; किंवा ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ञ) मधील, उप-खंड (एक) मध्ये, “ मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मनोरुग्ण करण्यास तो कारणीभूत होतो ” या मजकुराऐवजी, “ मानसिक स्वास्थ्य अधिनियम, २०१७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मानसिक आजाराने ग्रस्त होण्यास कारणीभूत होतो ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९८७ चा १४.

२०१७ चा १०.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**२८.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ८ मधील, “ तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल ” या मजकुराऐवजी, “ पाच वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**२९.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ९ मधील,—

(क) खंड (घ) मध्ये, “ सहवासी असणारा ” या मजकुरानंतर, “ किंवा रहिवाशी असणारा ” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (ज) मध्ये, " क्षारक पदार्थ ; किंवा " या मजकुराऐवजी, " क्षारक पदार्थ किंवा मादक द्रव्य ; किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१९८७ चा १४. २०१७ चा १०.

(ग) खंड (ञ) मधील, उप-खंड (एक) मध्ये " मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मनोरुग्ण करण्यास " या मजकुराऐवजी, " मानसिक स्वास्थ्य अधिनियम, २०१७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मानसिक आजाराने ग्रस्त होण्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम १० ची सुधारणा.

**३०.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम १० मध्ये, " पाच वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल " या मजकुराऐवजी, " सात वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु दहा वर्षांपर्यंत असू शकेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ मध्ये कलम २३क समाविष्ट करणे.

**३१.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम याच्या कलम २३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पोलीस अन्वेषणाकरिता विदा (डेटा) पुरविण्यात कसूर करणे.

"**२३क.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही मध्यस्थ किंवा परिरक्षक यांसह जो कोणतेही समाजमाध्यम व्यासपीठ किंवा आंतरजाल किंवा चल दूरभाष संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा) पुरवठादार, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्याप्रमाणे, त्यास, अशी मागणी मिळाल्यापासून, कामकाजाच्या सात दिवसांच्या कालावधीत, अशी कोणतीही विदा (डेटा) पुरविण्यास कसूर करील, तो, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५) याची कलमे ३२६क, ३२६ख, ३५४, ३५४क, ३५४ख, ३५४ग, ३५४घ, ३७६, ३७६क, ३७६कख, ३७६ख, ३७६ग, ३७६घ, ३७६घक, ३७६घख व ३७६ङ यांमध्ये महिलांविरुद्धच्या घोर व लैंगिक अपराधांशी संबंधित असणाऱ्या अपराधांबाबत तरतूद आहे. संसदेने, लैंगिक अत्याचार, लैंगिक छळवणूक व संभोगचित्रण या अपराधांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी आणि अशा अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्याकरिता, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (२०१२ चा ३२) अधिनियमित केला आहे. राज्यामध्ये महिला व बालकांविरुद्धच्या अपराधांमध्ये, विशेषतः लैंगिक अपराधांमध्ये अनेक पटींनी वाढ झालेली आहे. उक्त अधिनियमांमध्ये दंडात्मक तरतुदी केलेल्या असून देखील, निःष्पाप व असहाय्य महिलांवर व बालकांवर दुष्कृत्य करणारे, सतत अमानवी कृत्ये करीत आहेत. अलिकडेच, राज्यामध्ये अशी अनेक अमानवी कृत्ये घडून आलेली असून त्यामध्ये बलात्कार, त्यांना जिवंत जाळणे आणि त्यांचा खून करणे यांचा समावेश आहे. अशा घटनांमुळे समाजाच्या सद्सदविवेक बुद्धिस धक्का बसत आहे.

**२.** महिला व बालके यांच्या विरुद्धच्या निंदघोर व लैंगिक अपराधांवर प्रभावीपणे नियंत्रण करण्याच्या दृष्टीने, कडक शिक्षा करण्यासाठी आणि इतर संबंधित बाबींसाठी उक्त अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याकरिता सल्ला देण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त केली होती. समितीने, शासनास तिचा अहवाल सादर केला आहे. समितीने, आरोपीस प्रचंड प्रमाणात द्रव्यदंड व मृत्युदंडापर्यंतच्या शिक्षेची तरतूद करण्यासाठी आणि उक्त अपराधांचे जलदगतीने अन्वेषण करण्यासाठी व जलदरीत्या न्यायचौकशी करण्यासाठी भारतीय दंड संहिता, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यांमध्ये सुधारणा करण्याबाबत सुचविले आहे.

शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतलेला आहे आणि महिला व बालके यांच्या विरुद्धच्या अशा घोर व लैंगिक गुन्ह्यांकरिता अधिक कडक शिक्षा करण्याचे ठरविलेले आहे, आणि म्हणून, भारतीय दंड संहिता लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यांमधील महिला व बालके यांच्या विरुद्धच्या घोर व लैंगिक अपराधांशी संबंधित असणाऱ्या कलमांमध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** या प्रस्तावित कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) भारतीय दंड संहितेमध्ये खालील सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे :—

(एक) घोर व लैंगिक अपराधांसाठी अशा व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळासाठी आजीवन कारावासाची आणि प्रचंड प्रमाणात द्रव्यदंडाच्या शिक्षेची तरतूद करणे ;

(दोन) अशा गंभीर अपराधांसाठी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद करणे ;

(तीन) समाजमाध्यम, आंतरजाल किंवा चलदूरभाष (मोबाईल टेलिफोनी) संदेशवहन विदा (डेटा) पुरवठादार, इत्यादींनी अशा अपराधांशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही विदेची (डेटा) अन्वेषण अधिकाऱ्यास देवाणघेवाण करण्यात कसूर केल्यास ठरल्याबद्दल शिक्षेची तरतूद करणे ;

(चार) अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी माहिती किंवा सहाय्य न देण्याबद्दल शिक्षेची तरतूद करणे ;

(पाच) संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाद्वारे महिलांना धाकदपटशा दाखविल्याबद्दल शिक्षेची तरतूद करणे ;

(सहा) खोट्या तक्रारी केल्याबद्दल किंवा खोटी माहिती दिल्याबद्दल शिक्षेची तरतूद करणे.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये खालील सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे :—

(एक) माध्यमे, आंतरजाल किंवा चलदूरभाष (मोबाईल टेलिफोनी) संदेशवहन सेवा किंवा विदा (डेटा) पुरवठादार, इत्यादींना, अन्वेषण अधिकाऱ्याला अशा अपराधांशी संबंधित असणारा कोणताही दस्तऐवज किंवा वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) अभिलेख यांसह विदा (डेटा) पुरविणे किंवा देवाणघेवाण करणे अनिवार्य करणे ;

(दोन) अन्वेषण अधिकाऱ्याने ठिकाणांची झडती घेताना, शासकीय सेवकांना किंवा दोन सामाजिक कार्यकर्त्यांना पाचारण करणे ;

(तीन) पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने ज्या दिनांकास खबर नोंदविली होती त्या दिनांकापासून पंधरा कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत अन्वेषण पूर्ण करणे ;

(चार) दोषारोपपत्र दाखल केल्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या तीस दिवसांच्या कालावधीत चौकशी व न्यायचौकशी पूर्ण करणे ;

(पाच) पीडितांची व साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यासाठी पीठासन अधिकाऱ्याच्या कक्षात गुप्त (इन कॅमेरा) कार्यवाही करणे ;

(सहा) कोणत्याही व्यक्तीकडून किंवा राज्य शासनाकडून अपील निकाली काढण्याचा कालावधी सहा महिन्यावरून पंचेचाळीस दिवसांपर्यंत कमी करणे ;

(सात) उक्त अपराधांसाठी, आरोपी व्यक्तीला अटकपूर्व जामीन न मिळण्यासाठी कठोर तरतुदी करणे.

(३) लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ यामध्ये खालील सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे :—

(एक) लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याची कलमे ४, ८ व १० यांखालील अपराधांसाठी अशा आरोपी व्यक्तीला तिच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळासाठी आजीवन कारावासाच्या शिक्षेची व प्रचंड प्रमाणात द्रव्यदंडाची तरतूद करणे ;

(दोन) विवक्षित गंभीर अपराधांसाठी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद करणे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १३ डिसेंबर, २०२०.

**अनिल देशमुख,**
गृह मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १(२).—**या खंडान्वये, राज्यशासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर उल्लेखिलेला प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

## सन २०२० चे वि.स. विधेयक क्रमांक ५१ - शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० याचे परिशिष्ट.

### (भारतीय दंड संहिता अधिनियम, १८६० यातील उतारे)
### (सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५)

**१.** ते **१६६.** ** ** **

**१६६ अ.** जी कोणी लोकसेवक :— (लोकसेवक यांनी कायद्यात दिलेल्या निर्देशाचे पालन न करणे.)

(अ) आणि (ब) ** ** **

(क) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (अधिनियम क्र. २ सन १९७४) कलम १५४ (१) विशेषत: कोणतेही दखलपात्र अपराध जे कलम ३२६ अ, कलम ३२६ ब, कलम ३५४, कलम ३५४ ब, कलम ३७०, कलम ३७०अ, कलम ३७६, कलम ३७६अ, ३७६ अब, कलम ३७६ ब, कलम ३७६ क, कलम ३७६ ड, ३७६ डअ, ३७६ डब, कलम ३७६ इ किंवा ५०९ या सर्व नोंदी न घेण्याबाबत कसूर करील त्याला कमीत कमी ६ महिने परंतु ते २ वर्षापर्यंत वाढविता येईल अशी सश्रम कारावासाची शिक्षा होईल. आणि द्रव्यदंडाची शिक्षा सुद्धा होईल.

**१६६ ब.** ** ** **

**१६७.** ते **२२८.** ** ** **

**२२८ अ.** (१) कलम ३७६, कलम ३७६अ, ३७६अब, कलम ३७६ब, कलम ३७६क किंवा कलम ३७६ड, ३७६डअ, ३७६डब ज्याखाली ज्या व्यक्तीविरुद्ध अपराध घडल्याचे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसे आढळले असेल ती व्यक्ती कोण (या कलमात यापुढे 'बळी पडलेली व्यक्ती' म्हणून निर्दिष्ट) हे ज्यावरून ज्ञात होईल असे नांव किंवा मजकूर जो कोणी मुद्रित किंवा प्रकाशित करील त्याला दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि द्रव्यदंडासही पात्र होईल. (विवक्षित अपराधांना बळी पडलेली व्यक्ती कोण ते उघड करणे इत्यादी.)

(२) आणि (३) ** ** **

**२२९.** ते **३२६.** ** ** **

**३२६ अ.** जी कोणी व्यक्ती, कोणत्याही व्यक्तीला त्याचे शरीरातील कोणत्याही भागाला स्थायी किंवा तात्पुर्तिक नुकसान किंवा विद्रुप किंवा जाळून किंवा कापून अंपगत्व निर्माण करेल किंवा तेजाब फेकून किंवा पाजून किंवा इतर प्रकारे हेतुपुरस्सर माहिती असताना की ज्यामुळे दुखापत किंवा नुकसान होईल अशा दोषी व्यक्तीला कमीतकमी १० वर्षांची कारावासाची, परंतु आजीवन कारावासापर्यंतची शिक्षा व द्रव्यदंडाची शिक्षा होईल : (इच्छापूर्वक तेजाबद्वारा जबर दुखापत करणे.)

परंतु असे की, द्रव्यदंडाची रक्कम पीडित व्यक्तीला चिकित्सा करण्यासाठी योग्य होईल एवढी रक्कम द्रव्यदंडाबाबत शिक्षा असावी :

परंतु आणखी असे की, या कलम अन्वये लादण्यात आलेली दंडाची रक्कम पीडिताला देण्यात येईल.

**३२६ ब.** जी कोणी व्यक्ती, कोणत्याही व्यक्तीवर तेजाब फेकेल किंवा फेकणेचे प्रयत्न करील, किंवा तेजाब पाजण्याचे, किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे, इच्छापूर्वक स्थायी किंवा अस्थायी इजा होईल किंवा नुकसान होईल, किंवा विद्रुप होईल, किंवा जाळून नुकसान करील किंवा शरीरातील कोणताही अंग कापून त्याला विकलांग करील किंवा जबर दुखापत करील, दोषी आढळल्यास त्याला कमीत कमी ५ वर्ष, परंतु जी ७ वर्षापर्यंत वाढविता येईल, एवढ्या कालावधीची कारावासाची शिक्षा व द्रव्यदंडाची शिक्षा होईल. (इच्छापूर्वक तेजाब फेकणे किंवा तेजाब फेकणेबाबत प्रयत्न करणे.)

**स्पष्टीकरण-१.—**कलम ३२६ ए आणि या कलमाच्या प्रयोजनार्थ तेजाब यामध्ये इतर कोणताही पदार्थ ज्यामध्ये तेजाब सारखा किंवा शिजणारा (सक्षारक) या प्रकारचा गुण असणारा किंवा जळण देणारा, ज्यामुळे शरीराला इजा होईल, शरीरावर व्रण किंवा विद्रुपपण स्थायी किंवा अस्थायी अंपगत्व निर्माण करणारा पदार्थ सामील आहे.

**स्पष्टीकरण-२.—**कलम ३२६ ए आणि या कलमाच्या प्रयोजनार्थ स्थायी किंवा अस्थायी नुकसान किंवा नैसर्गिक आकार बदलणे, हे पुढे नीट होणार नाही किंवा मूळ स्वास्थ्यात पुनः येणार नाही असे होय.

**३२७.** ते **३७५.** ** ** **

बलात्काराबाबत शिक्षा.

**३७६.** (१) जी कोणी मात्र कलम ३७६ (२) शिवाय बलात्कार करेल त्याला शिक्षा म्हणून कमीत कमी १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा जी आजीवन कारावासापर्यंत वाढविता येईल आणि सह द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जी कोणी,–

(अ) पोलीस अधिकारी असून बलात्कार करेल.

*(i)* कोणतेही स्टेशन घराच्या परिसरात ; किंवा

*(ii)* पोलीस अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या महिलेवर किंवा त्या पोलीस अधिकाऱ्याच्या अधिनस्त काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या महिलेवर.

(ब) लोकसेवक असतांना त्यांचे ताब्यात असलेल्या महिलेवर किंवा त्या लोकसेवकाच्या अधिनस्त काम करणाऱ्या लोकसेवकाकडे ताब्यात असलेल्या महिलेवर ; किंवा

(क) सशस्त्र सेवातील सदस्याकडून ज्याला ज्या क्षेत्रात केंद्र किंवा राज्य सरकारने पाठविलेले असेल त्याने त्या क्षेत्रात बलात्कार केला ; किंवा

(ड) कारावासातील कर्मचारी किंवा कारावासाची देखरेख करणाऱ्या मंडळातील कोणत्याही सदस्याने किंवा सुधारगृहाची कोणत्याही सदस्याने किंवा त्या वेळच्या कायद्याप्रमाणे, इतर कोणत्याही जागेत किंवा मुलाचे किंवा महिलांच्या संस्थेतील ताब्यात असलेल्या कारावासातील, सुधारगृहातील, इतर किंवा संस्थेतील महिलेवर बलात्कार केले ; किंवा

(इ) दवाखान्यातील कोणतेही सदस्य किंवा दवाखान्यातील देखरेख करणाऱ्या संस्थेतील कोणतेही सदस्याने त्या दवाखान्यात असलेल्या महिलेवर बलात्कार केला ; किंवा

(फ) नातेवाईक, पालक, शिक्षक किंवा कोणत्याही विश्वासपात्र किंवा अधिकार प्राप्त असणाऱ्या व्यक्तीने बलात्कार केला ; किंवा

(ग) जाती व धर्म या अंतर्गत होणाऱ्या दंग्यात बलात्कार करणे ; किंवा

(ह) महिला जी गरोदर आहे, माहिती असतांना तिच्यावर बलात्कार करणे ;

(आय) महिला जी १६ वर्षापेक्षा कमी वयाची आहे, तिच्यावर बलात्कार करणे ; किंवा

(जे) जी महिला सहमती देण्यास असमर्थ आहे तिच्यावर बलात्कार करणे ; किंवा

(के) ज्या महिलेवर व्यक्तीचे वर्चस्व आहे, तिच्यावर त्या व्यक्तीने बलात्कार करणे ; किंवा

(एल) जी महिला मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग असेल तिच्यावर बलात्कार करणे ; किंवा

(एम) बलात्कार करतांना महिलेच्या शरीरास गंभीर दुखापत, किंवा विकलांगता किंवा विद्रुपता किंवा तिच्या जीवाला धोका होईल ; किंवा

(एन) त्याच महिलेवर वारंवार बलात्कार करतो,

त्याला शिक्षा म्हणून कमीत कमी १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा जी आजीवन कारावासाची शिक्षा, म्हणजे अपराधीची शिल्लक राहिलेली नैसर्गिक आयुष्यपर्यंत कारावासाची शिक्षा व द्रव्यदंडाची शिक्षा सुद्धा होईल.

**स्पष्टीकरण :** ह्या कलमासाठी–

(अ) "शस्त्रसेना" म्हणजे स्थलसेना, वायुसेना, नौसेना आणि कोणतीही शस्त्र सेवा जी कोणत्याही अधिनियमाद्वारा कोणत्याही काळासाठी स्थापित झालेली असेल, त्यातील कोणताही सदस्य तसेच त्यात निमलष्करी आणि इतर जास्त मदत करणारे सैन्य जी केंद्र किंवा राज्य शासनाच्या अधिपत्याखाली असेल ते सर्व समाविष्ट असणार.

(ब) "दवाखाना" म्हणजे दवाखान्याचा परिसर आणि कोणत्याही व्यक्तीच्या वैद्यकीय किंवा पुनर्वास करण्यासंबंधी जागा आणि ज्या परिसरात प्रकृती सुधारण्यासाठी विश्रांती घेण्याचे ठिकाण इत्यादी सर्व ठिकाणी.

(क) "पोलीस अधिकारी" म्हणजे तो पोलीस जे पोलीस अधिनियम, १८६१ (अधिनियम क्रमांक ५ सन १८६१) यामध्ये व्याख्यीत आहे तो अधिकारी.

(ड) "महिला" किंवा "मुलाची संस्था" म्हणजे ती संस्था ज्याला अनाथालय किंवा सोडून दिलेल्या महिला किंवा मुले किंवा विधवाघर किंवा इतर कोणतेही नावाने ओळखली जाणारी संस्था जी महिला किंवा मुलांच्या देखरेखीसाठी स्थापित केली जाते.

(३) ** ** ** **

**३७६ अ.** ते **३७६ क.** ** ** **

**३७६ ड.** जेव्हा महिलेवर एक किंवा अनेक व्यक्ती समुह तयार करून व एकाच समान उद्देश ठरवून महिलेवर बलात्कार करतात, त्यावेळी प्रत्येक व्यक्तीने महिलेवर बलात्कार केला आहे, असे गृहित धरले जाईल आणि त्यांना कमीत कमी २० वर्ष सश्रम कारावासाची जी आजीवन कारावासापर्यंत वाढविता येईल आणि आजीवन कारावासापर्यंत म्हणजे, अपराधीचे नैसर्गिक शिल्लक राहिलेले आयुष्य, म्हणजे मृत्यूपर्यंत आणि त्याला द्रव्यदंड सुद्धा होईल : सामूहिक बलात्कार.

परंतु असे की, द्रव्यदंडाची रक्कम पीडिताला तिच्या वैद्यकीय खर्च आणि तिच्या पुनर्वासमधील होणारा खर्च धरून निश्चित करणे :

परंतु आणखी असे की, या कलम अन्वये दंडाची रक्कम पीडिताला देण्यात येईल.

**३७६ डअ.** जेव्हा महिला ही १६ वर्षापेक्षा कमी वयाची असतांना, एकच हेतूने तिच्यावर एक किंवा अनेक व्यक्ती समूहाने बलात्कार केला असेल, त्यावेळी सर्व व्यक्तींनी तिच्यावर बलात्कार केला आहे, असे गृहीत धरले जाईल आणि प्रत्येकाला आजीवन कारावास म्हणजे व्यक्तीच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत कारावासाची शिक्षा द्रव्यदंडासह होईल. मात्र द्रव्यदंडाची रक्कम पीडिताच्या वैद्यकीय उपचार आणि तिच्या पुनर्वसनासाठी पुरेशी असेल मात्र पुढे या कलम अन्वये अधिक द्रव्यदंड दिला असेल तो द्रव्यदंड पीडिताला मिळेल. सोळा वर्षापेक्षा कमी वयाच्या महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याबद्दल शिक्षा.

**३७६ डब.** ते **३७६ ई.** ** ** **

**३७७.** ते **५११.** ** ** **

## ( फौजदारी प्रक्रिया संहिता अधिनियम, १९७३ यातील उतारे )
## ( सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २)

**१. ते ९९.** ** ** **

**१००.** (१) ते (३) ** ** ** बंदिस्त जागेची झडती पद्धती.

(४) या प्रकरणाखाली झडती घेण्यापूर्वी, ती झडती घेण्याच्या बेतात असलेला अधिकारी किंवा अन्य व्यक्ती झडती घ्यावयाची जागा ज्या स्थानिक भागात असेल तेथील दोन किंवा अधिक निःपक्ष व संभावित रहिवाशांना अथवा सदर भागातील असा कोणताही रहिवासी उपलब्ध नसेल किंवा झडतीचा साक्षीदार होण्यास राजी नसेल तर, अन्य कोणत्याही भागातील अशा रहिवाशांना उपस्थित राहण्याची व झडतीस साक्षी राहण्याची विनंती करील व त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही तसे करण्याचा लेखी आदेश काढू शकेल.

**१०१. ते १६३.** ** ** **

कबुलीजबाब आणि जबाब नोंदून घेणे.

**१६४.** (१) ते (५) ** ** **

(५-अ) (अ) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३५४, कलम ३५४ अ, कलम ३५४ ब, कलम ३५४ क, कलम ३५४ ड, कलम ३७६, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२), कलम ३७६ अ, कलम ३७६ अब, कलम ३७६ ब, कलम ३७६ क, कलम ३७६ ड, कलम ३७६ डअ, कलम ३७६ डब, कलम ३७६ ई किंवा कलम ५०९ अन्वये शिक्षायोग्य असणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत, जिच्या बाबतीत असा अपराध करण्यात आला असेल अशा व्यक्तीचा जबाब, न्यायदंडाधिकारी, असा अपराध पोलिसांच्या निदर्शनास आणण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर पोट-कलम (५) मध्ये विहित करण्यात आलेल्या रीतीने नोंदवील :

परंतु असे की, जर जबाब देणारी व्यक्ती, तात्पुरती किंवा कायमस्वरुपात मानसिकदृष्ट्या किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग झाली असेल तर, तो दंडाधिकारी जबाब नोंदवून घेण्यासाठी दुभाष्याचे किंवा विशेष शिक्षण देणाऱ्याचे सहाय्य घेईल :

परंतु आणखी असे की, जर जबाब देणारी व्यक्ती, तात्पुरती किंवा कायमस्वरुपात मानसिकदृष्ट्या किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग झालेली असेल तर, त्या व्यक्तीने दुभाष्याच्या किंवा विशेष शिक्षण देणाऱ्याच्या मदतीने दिलेल्या जबाबाचे दृकश्राव्य चित्रण (व्हिडिओग्राफ) करण्यात येईल.

(ब) ** ** ** **

(६) ** ** **

**१६४ अ.** ** ** **

**१६५.** ते **१७२.** ** ** **

अन्वेषण पूर्ण झाल्यावर पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल.

**१७३. (१)** ** ** **

(१अ) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलमे ३७६, ३७६ अ, ३७६ अब, ३७६ ब, ३७६ क, ३७६ ड, ३७६ डअ, ३७६ डब किंवा ३७६ इ. खालील अपराधाच्या संबंधातील अन्वेषण, ज्या तारखेस पोलीस ठाण्याच्या अंमलदार (प्रभारी) अधिकाऱ्याने माहिती नोंदविलेली असेल त्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत, पूर्ण करण्यात यावे.

(२) ते (८) ** ** **

**१७४.** ते **३०८.** ** ** **

कार्यवाही पुढे ढकलणे : तहकूब करणे अधिकार.

**३०९.** (१) प्रत्येक चौकशीत किंवा न्यायचौकशीत, उपस्थित असलेल्या सर्व साक्षीदारांची तपासणी पूर्ण होईपर्यंत ती कार्यवाही रोजच्या रोज चालू ठेवण्यात येईल. मात्र, लगत पुढील दिवसापेक्षा अधिक काळ ती तहकूब करणे न्यायालयाला नमूद केलेल्या कारणासाठी आवश्यक वाटेल तर ती बाब वगळून असे करण्यात येईल.

परंतु, असे की, चौकशी किंवा न्यायचौकशी हा भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५), कलम ३७६, कलम ३७६ अ, कलम अब, कलम ३७६ ब, कलम ३७६ क किंवा कलम ३७६ ड, कलम ३७६ डअ किंवा कलम ३७६ डब खालील अपराधांच्या संबंधात असेल तर, अशी चौकशी किंवा न्यायचौकशी ही शक्य तोवर दोषारोपत्र दाखल करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात आली पाहिजे.

(२) ** ** **

**३१०.** ते **३२६,** ** ** **

**३२७.** (१) ** ** ** न्यायालय खुले असणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी "भारतीय दंड संहिते"चे कलम ३७६ याखालील बलात्कार अगर कलम ३७६ अ, कलम अ ब, कलम ३७६ ब, कलम ३७६ क, कलम ३७६ ड, कलम ३७६ ड अ, कलम ३७६ ड ब किंवा कलम ३७६ ई याखालील एखादा अपराध यासंबंधीची चौकशी व संपरीक्षा कक्षांतर्गत चालविली जाईल :

परंतु, पीठासीन न्यायाधीश स्वतःला योग्य वाटल्यास किंवा दोन्हीपैकी कोणत्याही पक्षाने तसा अर्ज केल्यास, एखाद्या विशिष्ट व्यक्तीला न्यायालयाच्या वापरात असलेल्या खोलीत किंवा इमारतीत येण्यास किंवा तेथे उपस्थित राहण्यास किंवा थांबण्यास परवानगी देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, शक्य असेल तेथवर, एखाद्या महिला न्यायाधिशाद्वारे किंवा दंडाधिकाऱ्याद्वारे बंद खोलीतील संपरीक्षा करण्यात येईल.

(३) ** ** **

**३२८. ते ३७३.** ** ** **

**३७४.** (१) ते (३) ** ** ** दोषसिद्धिविरुद्ध अपील.

(४) जेव्हा भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६, कलम ३७६ अ, कलम ३७६ अ ब, कलम ३७६ ब, कलम ३७६ क, कलम ३७६ ड, कलम ३७६ ड अ, कलम ३७६ ड ब, किंवा कलम ३७६ इ अन्वये दिलेल्या शिक्षादेशाविरूद्ध अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा, असे अपील दाखल करण्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत निकालात काढण्यात येईल.

**३७५.** ते **३७६.** ** ** **

**३७७.** (१) ते (३) ** ** ** राज्य शासनाकडून शिक्षेविरुद्ध अपील.

(४) जेव्हा भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६ अ, कलम ३७६ अब, कलम ३७६ ब, कलम ३७६ क, कलम ३७६ ड, कलम ३७६ ड अ, कलम ३७६ ड ब किंवा कलम ३७६ इ अन्वये दिलेल्या शिक्षादेशाविरूद्ध अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा, असे अपील दाखल करण्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत निकालात काढण्यात येईल.

**३७८.** ते **४३८.** ** ** **

**४३९.** (१) ** ** ** जामिनाविषयी उच्च न्यायालयाचे किंवा सत्र न्यायालयाचे अधिकार.

(१-अ) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) च्या कलम ३७६ च्या पोट-कलम (३) किंवा कलम ३७६अ ब किंवा कलम ३७६ ड अ किंवा कलम ३७६ ड ब खालील व्यक्तीच्या जामीन अर्जाच्या सुनावणीच्या वेळी, वर्दी देणाऱ्या व्यक्तीची किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची उपस्थिती, बंधनकारक असेल.

(२) ** ** **

**४४०.** ते **४८४.** ** ** **

# पहिली अनुसूची

## अपराधांचे वर्गीकरण

**स्पष्टीकरणात्मक टिप्पणी :** (१) भारतीय दंड संहितेखालील अपराधांसंबंधात, ज्याचा क्रमांक पहिल्या स्तंभात दिला आहे त्या कलमासमोरील स्तंभ दोन व तीन मधील नोंदी म्हणजे भारतीय दंड संहितेतील अपराधाची व्याख्या किंवा त्याकरिता विहित केलेली शिक्षा म्हणून नव्हे, तर केवळ कलमाचा सारांश दर्शविणाऱ्या म्हणून उद्देशित आहेत.

(२) या अनुसूचीत (एक) "प्रथम वर्ग दंडाधिकारी" आणि "कोणताही दंडाधिकारी" या शब्दप्रयोगात महानगर दंडाधिकारी समाविष्ट आहेत, पण कार्यकारी दंडाधिकारी नाहीत ; (दोन) "दखलपात्र" हा शब्द "पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करू शकेल" या अर्थाने योजलेला आहे ; आणि (तीन) "बिनदखली" हा शब्द "पोलीस वॉरंटाशिवाय अटक करणार नाही" या अर्थाने योजलेला आहे.

### एक - भारतीय दंड संहितेखालील अपराध

| कलम | अपराध | शिक्षा | दखलपात्र किंवा बिनदखली | जामीनपात्र किंवा बिनजामिनी | कोणत्या न्यायालयात संपरीक्षायोग्य |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| **१०९. ते ३२६.** | ** | ** | ** | ** | ** |
| **३२६ अ.** | ॲसिड इ. चा वापर करून स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे | १० वर्षापेक्षा कमी नाही परंतु आजीवन कारावासापर्यंत असू शकेल, अशी शिक्षा व पीडित व्यक्तीला द्यावयाचा दंड. | दखली | बिनजामिनी | सत्र न्यायालय |
| **३२६ ब.** | स्वेच्छेने ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे. | ५ वर्षांपर्यंतची परंतु ७ वर्षांपर्यंत असू शकेल अशी कारावासाची शिक्षा व दंड. | दखली | बिनजामिनी | सत्र न्यायालय |
| **३२७. ते ३७५.** | ** | ** | ** | ** | ** |
| **३७६.** | बलात्कार | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढविता येईल अशी सश्रम कारावासाची शिक्षा व द्रव्यदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | पोलीस अधिकाऱ्याने किंवा लोकसेवकाने किंवा सशस्त्र दलातील सदस्याने किंवा तुरुंग, सुधारगृह किंवा हवालतीची इतर ठिकाणे किंवा महिलांच्या किंवा मुलांच्या संस्था यांच्या व्यवस्थापना-वरील व्यक्तीने किंवा कर्मचारीवर्गातील व्यक्तीने किंवा रुग्णालयाच्या व्यवस्थापनावरील व्यक्तीने किंवा कर्मचारीवर्गातील व्यक्तीने बलात्कार केला असेल किंवा बलात्कारित व्यक्तीचा विश्वस्त किंवा प्राधिकारी या स्थितीत असताना एखाद्या व्यक्तीने बलात्कार केला असेल किंवा बलात्कारित व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईक व्यक्तीने बलात्कार केला असेल. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढविता येईल म्हणजेच त्या व्यक्तीच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या काळात तिला कारावासात आयुष्य घालवावे लागेल अशी सश्रम कारावासाची किंवा शिक्षा व द्रव्यदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय |
| | सोळा वर्षांखालील वयाच्या महिलेवर बलात्कार केल्याचा अपराध करणारी व्यक्ती. | २० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढविता येऊ शकेल म्हणजेच त्या व्यक्तीच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या काळात तिला कारावासात आयुष्य घालवावे लागेल अशी सश्रम कारावासाची शिक्षा व द्रव्यदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| **३७६ अ.** ते **३७६ क.** | ** | ** | ** | ** | ** |
| **३७६ ड.** | सामूहिक बलात्कार | २० वर्षांपेक्षा कमी नाही परंतु आजीवन कारावासापर्यंत म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक आयष्याच्या उर्वरित कालावधीसाठी सश्रम कारावासाची शिक्षा व दंडाची रक्कम पीडित व्यक्तीला द्यावयाची | दखली | बिनजामिनी | सत्र न्यायालय |
| **३७६ डअ.** | सोळा वर्षांखालील वयाच्या महिलेवर सामूहिक बलात्कार. | आजीवन कारावास, म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक आयुष्याच्या उर्वरित कालावधीसाठी सश्रम कारावासाची शिक्षा किंवा देहदंडाची शिक्षा. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय |
| **३७६ डअ.** ते **३७६ ई.** | ** | ** | ** | ** | ** |
| **३७७.** **ते** **५११.** | ** | ** | ** | ** | ** |

## ( लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ यातील उतारे )

## ( सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२)

**१.** ते **३.** ** ** **

**४.** (१) ** ** ** लिंगप्रवेश असलेल्या लैंगिक हमल्याबद्दल शिक्षा.

(२) जो कोणी सोळा वर्षे वयाखालील बालकावर लिंगप्रवेश अंतर्भूत लैंगिक अत्याचार करेल तो वीस वर्षांपेक्षा कमी नाही; परंतु आजीव कारावासापर्यंत वाढविता येईल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस पात्र राहील ; याचा अर्थ त्या व्यक्तीच्या नैसर्गिक आयुष्यमानापर्यंत असेल आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस सुद्धा पात्र राहील.

(३) ** ** ** **

**५.** (अ) ते (क) ** ** ** लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला गंभीर स्वरूपाचा लैंगिक हमला.

(ड) जो काणी त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेल्या तुरूंग, सुधारगृह, संरक्षणगृह, निरीक्षणगृह किंवा ताब्यात ठेवण्याचे किंवा देखभाल किंवा संरक्षण देण्याचे कोणतेही ठिकाण यामधील व्यवस्थापनवर्ग किंवा कर्मचारीवर्ग हा असा तुरूंग, सुधारगृह,संरक्षणगृह, निरीक्षणगृह किंवा ताब्यात ठेवण्याचे किंवा देखभाल किंवा संरक्षण करण्याचे कोणतेही ठिकाण येथे सहवासी असलेल्या बालकावर लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला लैगिक हमला करील किंवा

(ई) ते (ग) ** ** ** **

(ह) जो कोणी प्राणघातक हत्यारे, आग, तापलेले पदार्थ किंवा क्षारक पदार्थ यांचा वापर करून बालकावर लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला लैगिक हमला किंवा

(आय) ** ** **

(जे) जो कोणी, बालकावर—

(एक) मानसिक स्वास्थ अधिनियम, १९८७ (१९८७ चा १४) याच्या कलम २ च्या खंड (एल) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकाला शारीरिकदृष्ट्या असमर्थ करणारा किंवा बालकाला मनोरुग्ण बनविण्यास कारणीभूत ठरेल असा किंवा नियमित कामे पार पाडण्यास बालक तात्पुरते किंवा कायमस्वरुपी असमर्थ ठरेल अशा कोणत्याही प्रकारच्या दुर्बलतेस कारणीभूत ठरेल असा किंवा

(दोन) त (चार) ** ** **

(के) ते (यू) ** ** **

**६.** आणि **७.** ** ** **

**८.** जो कोणी लैगिक हमला करील तो, तीन वर्षापेक्षा कमी नसेलः परंतु पाच वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही एका प्रकारच्या कारावासाच्या शिक्षस व द्रव्यदंडासही पात्र असेल. लैंगिक हमल्याबद्दल शिक्षा.

गंभीर स्वरुपाचा लैंगिक हमला.

**९.** (अ) ते (क) ** ** **

(ड) जो काणी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेल्या तुरुंग किंवा सुधारगृह किंवा संरक्षणगृह किंवा निरीक्षणगृह किंवा ताब्यात ठेवण्याचे किंवा देखभाल किंवा संरक्षण करण्याचे कोणतेही ठिकाण यामधील व्यवस्थापनवर्ग किंवा कर्मचारीवर्ग हा असा तुरुंग किंवा सुधारगृह किंवा संरक्षणगृह किंवा निरीक्षणगृह किंवा ताब्यात ठेवण्याचे किंवा संरक्षण करण्याचे कोणतेही ठिकाण येथे सहवासी असलेल्या बालकावर लैंगिक हमला करील ; किंवा

(इ) ते (ग) ** ** **

(ह) जो कोणी प्राणघातक हत्यारे, आग तापलेले पदार्थ किंवा झिजवणारा पदार्थ यांचा वापर करून बालकावर लैंगिक हमला ; किंवा

(आय) ** ** **

(जे) जो कोणी बालकावर—

(एक) मानसिक स्वास्थ अधिनियम, १९८७ (१९८७ चा १४) याच्या कलम २ च्या खंड (एल) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकाला शारीरिकदृष्ट्या असमर्थ करणारा किंवा बालकाला मनोरुग्ण बनविण्यास कारणीभूत ठरेल असा किंवा नियमित कामे पार पाडण्यास बालक तात्पुरते किंवा कायमस्वरूपी असमर्थ ठरेल अशा कोणत्याही प्रकारच्या किंवा दुर्बलतेस कारणीभूत ठरेल असा ; किंवा

(दोन) ** ** **

(के) ते (व्ही) ** ** **

गंभीर स्वरुपाच्या लैंगिक हमल्याबद्दल शिक्षा.

**१०.** जो कोणी गंभीर स्वरूपाचा लैंगिक हमला करील त्याला पाच वर्षांपेक्षा कमी नसेल, पण सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्या तरी एका प्रकारच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल व तो द्रव्यदंडासही पात्र असेल.

**११.** ते **४६.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.]**

**[ भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. अनिल देशमुख,**
गृह मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई